# मुंबई विद्यापीठ

मासंविक-१

क्र. इएसटी/आयसीडी/२०२२-२३/ १०५६
मुंबई – ४०० ०३२.
२८ जुलै, २०२२.

**परिपत्रक:**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, ग्रंथपाल, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील गट 'अ' ते गट 'क' संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकेतर अधिकारी / कर्मचाऱ्यांचे दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या वार्षीक कालावधीचे गोपनीय अहवाल दिनांक ३० जुन, २०२२ पर्यंत मानव संसाधन विकास कक्षाकडे येणे अपेक्षीत होते. परंतु असे निदर्शनास येते की अद्यापही अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल मानव संसाधन विकास कक्षास प्राप्त झाले नाहीत. तरी या परिपत्रकाद्वारे पुन:श्च कळविण्यात येते की, दिनांक १ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२२ पर्यंतचे गोपनीय अहवाल दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ पर्यंत पाठविण्यात यावेत.

तसेच असेही कळविण्यात येते की, शिक्षकेतर अधिकारी / कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer), पुनर्विलोकन अधिकारी (Reviewing Officer) यांचे निरीक्षणासह, नाव/पदनाम/सही शिक्यानिशी मानव संसाधन विकास कक्ष-१ कडे पाठविण्याची व्यवस्था करावी. सोबत दिलेल्या तक्त्यानुसार गोपनीय अहवालांवर सह्या कराव्यात. अपुर्ण किंवा सह्या आणि शिक्के नसलेले गोपनीय अहवाल मानव संसाधन विकास कक्षास प्राप्त झाल्यास ते संबंधित विभागाकडे परत पाठविण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

प्रभारी कुलसचिव

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख

स्वीय सहायक : १) कुलगुरू २) प्र-कुलगुरु ३ ) कुलसचिव ४) वित्त व लेखा अधिकारी
५) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ ६) दूर व मुक्त अध्ययन संस्था

अभिलेख कक्ष – १०
(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१ मुंबई युनिव्हर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
२ सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ
३ सरचिटणीस, शैक्षणिक कल्याणकारी कर्मचारी संघटना
४ सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागसवर्गिय कर्मचारी संघटना

# मुंबई विद्यापीठ

गट 'अ' ते गट 'क' साठी गोपनीय अहवालावर प्रतिवेदन अधिकारी ( Reporting Officer), पुर्नविलोकन अधिाकरी (Reviewing Officer) यांच्या खालील तक्त्यानुसार सह्या घ्याव्यात.

| गट | | सही | | सही |
|---|---|---|---|---|
| गट 'अ' | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | कुलसचिव | पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) | कुलगुरू |
| गट 'ब' | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | कुलसचिव | पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) | कुलगुरू |
| गट 'क' | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, स्वीय सहायक, संबंधित विभागप्रमुख | पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) | कुलसचिव/ संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ,/ दूर व मुक्त अध्ययन संस्था / वित्त व लेखा अधिकारी |
| | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | ग्रंथपाल | पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) | कुलसचिव |
| | प्रतिवेदन अधिकारी (Reporting Officer) | विद्यापीठ उपकेंद्रातील सहायक कुलसचिव किंवा तत्सम | पुर्नविलोकन अधिकारी (Reviewing Officer) | कुलसचिव |